लोकमत

# ३८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ३८ परीक्षा शनिवारी दिवसभरात सुरळीत पार पडल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. बीए, बीकॉम, बीटेक, बीसीए, बीबीए, बीएबीएड, बीएसस्सी, बीएसडब्ल्यू, बीई, एमए, एमकॉम, एमलॉ, एमबीए, एमजे, एमएस्एस्सी अशा एकूण ३८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंग जाधव यांनी दिली.

15 JAN 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी जागतिक आघाडीच्या 'कॉग्निझंट' कंपनीचा प्रमुख

## आय.टी. क्षेत्रातील दबदबा अधोरेखित; मुकेश अंबानी यांच्यापेक्षा चारपट अधिक पगार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



मॅनहॅटन न्यूयॉर्क (यूएस) येथील इन्फोसिसच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीरीत्या सांभाळणारे शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी रवी कुमार एस. यांची 'कॉग्निझंट' या आय.टी. क्षेत्रातील जागतिक आघाडीच्या कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी निवड झाली आहे. भारतीय म्हणून ही अभिमानाची बाब असून, ती शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवणारी ठरली आहे.

रवी कुमार यांचा जीवनप्रवास चकित करणारा आणि विद्यार्थ्यांना प्रेरणादायी आहे. १९८७ ते १९९१ या कालावधीत त्यांनी शिवाजी विद्यापीठ संलग्न वारणानगरच्या तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीची केमिकल इंजिनिअरिंग पदवी प्राप्त केली. १९९६ मध्ये झेवियर्स इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधून एमबीएची पदव्युत्तर पदवी घेतली. रवी कुमार यांनी याबाबतची माहिती त्यांच्या लिंकडइन अकाऊंटवर दिली आहे.

१९९१ ते १९९४ या काळात बीएआरसीमध्ये त्यांनी 'क' वर्ग सायंटिस्ट म्हणून काम केले. प्राईस वॉटरहाऊस कूपर्स कंपनीत सीनिअर कन्सल्टंट, केंब्रिज टेक्नॉलॉजी पार्टनर्स येथे असोसिएट डायरेक्टर व सीआरएम लाईन मॅनेजर, इन्फोसिसमध्ये अध्यक्ष अशा महत्त्वाच्या ज़बाबदाऱ्या पेलल्या आहेत. ॲडव्हान्ससीटी, डीजीमार्क, यूएस चेंबर ऑफ कॉमर्स, इंटरनॅशनल टेनिस हॉल ऑफ फेम, ट्रान्स युनियन आदी जागतिक संस्था-संघटनांवर संचालक म्हणून ते कार्यरत आहेत. सातत्याने उंचावत राहिलेल्या त्यांच्या कारकिर्दीस कॉग्निझंटच्या सीईओपदामुळे सोनेरी किनार लाभली आहे. ब्रायन हंप्रिझ यांच्याकडून ते पदाचा कार्यभार स्वीकारतील. ब्रायन १५ मार्चपर्यंत कंपनीत विशेष सल्लागार म्हणून कार्यरत राहणार आहेत.

### नवीन सीईओंचा पगार थक्क करणारा

उल्लेखनीय बाब म्हणजे, एका इंग्रजी वृत्तपत्राने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, रवी कुमार यांचे वेतन १ मिलियन अमेरिकी डॉलर आहे. मात्र, त्यांना मिळणाऱ्या विविध पर्क्स विचारात घेता त्यांना ७ मिलियन डॉलर वेतन मिळणार आहे. जगातील प्रमुख आय.टी. कंपनी कॉग्निझंटच्या नवीन सीईओंचा पगार थक्क करणारा आहे. अब्जाधीश उद्योजक मुकेश अंबानी यांच्यापेक्षा त्यांचा पगार चारपट अधिक आहे.

सकाळ

# व्यवस्थापन समितीवर सिद्धार्थ शिंदे यांची निवड

## शिवाजी विद्यापीठ; राज्यपाल नियुक्त सदस्य

कोल्हापूर, ता. १४ : प्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक सिद्धार्थ शिंदे यांची शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून आज घोषणा झाली. राज्यपाल कार्यालयातून याबाबतचे पत्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना देण्यात आले. प्रसिद्ध साहित्यिक रणजित देसाई आणि राधानगरी धरणाचे तत्कालीन मुख्य अभियंते पी. के. शिंदे यांचे ते नातू होत.



सिद्धार्थ शिंदे

सिद्धार्थ शिंदे यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधून पदवी घेतली आहे. त्यानंतर ब्रिटनमधील विद्यापीठातून त्यांनी ऑटोमोबाईल इंजिनिअरिंगमध्ये एम. एस. केले. महिंद्रा कंपनीमध्ये त्यांनी संशोधक म्हणून काम केले आहे. त्यानंतर त्यांनी हॉटेल व्यवसायामध्ये प्रवेश केला. त्याचबरोबर किसान संघाचे जिल्हा उपाध्यक्ष आहेत. अभियांत्रिकीबरोबरच शेती प्रश्वांचाही त्यांचा अभ्यास आहे. त्यांनी शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांबाबत सक्रिय आंदोलने केली आहेत. शेतकऱ्यांसाठी नेट कनेक्टिव्हिटी, पीक विमा योजनेत तांदळाचा समावेश करणे, विमानतळावर शेतकऱ्यांना कार्गो सुविधा देणे, पुराचा प्रश्न, रत्नागिरी-नागपूर हायवेमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रश्न या विषयांची त्यांनी यशस्वी हाताळणी केली आहे. एक हॉटेल व्यावसायिक म्हणून त्यांनी आपले 'हॉटेल कृष्णा इन' हे पूर्णपणे पर्यावरणपूरक केले आहे. तसेच २००९ पासून मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनात त्यांचा सहभाग आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी रवी कुमार एस. 'कॉग्निझंट'चे प्रमुख

## तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंगमध्ये घेतले शिक्षण

▶ सकाळ वृत्तसेवा



रवी कुमार एस.

कोल्हापूर, ता. १४ : मूळ भारतीय असणारे रवी कुमार एस. यांची 'कॉग्निझंट' या आयटी क्षेत्रातील जागतिक आघाडीच्या कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी निवड झाली. विशेष म्हणजे ते शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर आहेत. तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे येथून केमिकल इंजिनिअरिंगमध्ये पदवी घेतली आहे.

विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, रवी कुमार यांनी १९८७ ते १९९१ या कालावधीत शिवाजी विद्यापीठातून अभियांत्रिकीची पदवी घेतली. त्यानंतर १९९६ मध्ये झेवियर्स इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधून त्यांनी एमबीएची पदव्युत्तर पदवी संपादन केली. १९९१ ते १९९४ या काळात बीएआरसीमध्ये त्यांनी 'क' वर्ग सायंटिस्ट म्हणून काम केले. त्यानंतर प्राईसवॉटरहाऊसकूपर्स या प्रख्यात कंपनीत सीनिअर कन्सल्टंट, केंब्रिज टेक्नॉलॉजी पार्टनर्स येथे असोसिएट डायरेक्टर व सीआरएम लाईन मॅनेजर, ऑरॅकल कॉर्पोरेशनमध्ये बिझनेस हेड (साऊथ ईस्ट एशिया), सेपियंट कॉर्पोरेशनमध्ये डायरेक्टर (सीआरएम व एससीएम व्हॅल्यू सेट्स), इन्फोसिसमध्ये सीनियर व्हाईस प्रेसिडेंट अशा उच्च पदांवर काम केले आहे. सध्या ते मॅनहॅटन, न्यूयॉर्क (यूएस) इथून इन्फोसिसच्या प्रेसिडेंट पदाची धुरा सांभाळत आहेत.

दरम्यान, कॉग्निझंट ही माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील अग्रगण्य कंपनी आहे. या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रवीकुमार पदभार स्वीकारणार आहेत. या संस्थेत या पदावर काम करणे हा एक मोठा बहुमान आहे.

### सात मिलियनचे एकूण पॅकेज

■ एका वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, रवी कुमार यांचे बेसिक वेतन १ मिलीयन अमेरिकी डॉलर असणार आहे, तरी त्यांना मिळणाऱ्या विविध पर्क्स विचारात घेता एकूण वेतन हे ७ मिलियन डॉलरच्या घरात असेल.

तरूण भारत

# अ. भा. विद्यापीठ तलवारबाजीत आजऱ्याच्या ज्योतीला कास्य

**कोल्हापूर :** जम्मू येथील जम्मू विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ फेन्सिंग (तलवारबाजी) स्पर्धेमध्ये



कोल्हापूरच्या ज्योती सुतारने फॉईल या क्रीडा प्रकारमध्ये कांस्य पदक प्राप्त केले. या यशस्वी कामगिरीमुळे तिची खेलो इंडियांतर्गत उत्तरप्रदेशमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

ज्योती ही आजरा महाविद्यालयाची आंतरराष्ट्रीय तलवारबाज खेळाडू आहे. तीने डिसेंबरमध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय तलवारबाजी स्पर्धेत फाईल व सेबर या दोन्ही प्रकारात प्रत्येकी १ सुवर्ण पदक मिळवले होते. या कामगिरीची दखल घेऊन तिची अखिल भारतीय स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ. संघात निवड करण्यात आली होती. तिला आजरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सादले, उपप्राचार्य दिलीप संकपाळ, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. धनंजय पाटील व अल्बर्ट फर्नांडिस यांचे मार्गदर्शन लाभत आहे.